महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेवर सदस्याची
<u>नियुक्ती करणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १४२/२२-स
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, **सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग** क्रमांक : मरास-२०१५/प्र.क्र. ७/२२-स, दि. २१ फेब्रुवारी, २०१५.
२) शासन निर्णय, **सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग** क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २२/२२-स, दि. ५ एप्रिल, २०१८.
३) शासन निर्णय, **सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग** क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २२/२२-स, दि. १६ एप्रिल, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेवर संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर सदर परिषदेवर संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये सहा सदस्यांचा समावेश करण्यात आला. मात्र परिषदेचे कामकाज हाताळण्यासाठी आणखी सदस्यांचा समावेश करण्याची आवश्यकता असल्याने महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेमध्ये अन्य सदस्यांचा देखील समावेश करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४-अ (१) मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेची नव्याने पुर्नरचना संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. या परिषदेचा कार्यकाल दिनांक २१.०२.२०१८ पासून तीन वर्षे अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल तोपर्यंत राहील. महाराष्ट्र राज्य सहकार परिषद, पुणे या परिषदेवर सदस्य म्हणुन श्री. नामदेवराव पांडूरंग घाडगे, पुणे यांची नियुक्ती याद्वारे करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेची कार्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४-अ चे पोटकलम (३) प्रमाणे राहतील. त्यानुसार सदर परिषदेचे कार्य संदर्भाधीन शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०७१८१४३७१६१९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJU KALLUJI NARPANDE

Digitally signed by RAJU KALLUJI NARPANDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=445c05397d3e5fac583c028b06de2a1fa2b53743e982f5c31c9f3ffb560b0c16, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f8faa195025519ecce143f48fe16b8572d279b777914644 1b412b267fb25acd8, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJU KALLUJI NARPANDE
Date: 2019.07.18 14:46:24 +05'30'

(राजू नरपांडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

२. मा. मंत्री (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाम, मंत्रालय, मुंबई,
४. श्री. शेखर चरेगावकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद,पुणे,
५. श्री. नामदेवराव पांडुरंग घाडगे, पुणे,
६. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे,
१०. निवड नस्ती का. २२-स.